ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-VI JUNE 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# परभणी शहरातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी एक सर्वेक्षणात्मक अभ्यास.''

संशोधक
**प्रा.डॉ.सुनिता यादवराव पाटील**
सहाय्यक प्राध्यपक
''शिक्षणशास्त्र संकुल''
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

## सारांश

अभ्यास! अभ्यास!! अभ्यास!!! जो तो अभ्यासाविषयी आपल्याला सांगत असतो. अभ्यासाबद्दल मार्गदर्शन करत असतो. आपण इयत्ता पहिली पासुन ते आत्तापर्यंत अभ्यास हा शब्द ऐकतच आलोत,आई,वडील,भाऊ,बहीण व शिक्षण वृंद आपल्याला अभ्यासाविषयी नियमीपणे न चुकता सांगतच असतात. परंतू आपल्याला अभ्यास म्हणजे नेमके काय? त्याचा अर्थ काय? अभ्यास हा कशा प्रकारे करावा? या विषयी जर माहितीच नसेल तर मग तेथे खरी अडचण निर्माण होती. सध्याचे युग हे विज्ञानाचे, माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे.या युगात जर टिकायचे असेल तर अभ्यासाला खुप महत्वाचे स्थान आहे. हे स्थान जर विद्यार्थ्यांमध्ये टिकवून ठेवावयाचे असेल तर अभ्यास सवयी योग्य त्या वेळी योग्य त्या वयात योग्य त्या प्रमाणात रूजवल्या गेल्या पाहिजे. हया अभ्यास सवयी विद्यार्थ्यांमध्ये योग्य त्या वेळी रूजविल्या गेल्या नाहीत त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेवर विपरीत पहरणाम झालेला दिसुन येतो.म्हणुन संबधीत समस्येवर संशोधन करण्याचे योजले आहे.

## प्रस्तावना :—

आजचे युग हे विज्ञान युग, आहे आणि या विज्ञान युगाच्या जोरावर माहिती तंत्रज्ञानाने खुप मोठी झेप घेतली आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जर विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास आवश्यक आहे आणि हा सर्वांगिण विकास शिक्षणाच्या आधारे पूर्ण करता येऊ शकतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात चांगली प्रगती घडवुन अणावयाची असेल तर अभ्यास सवयीचा उपयोग महत्वपुर्ण ठरतो. विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याच्या वेगवेगळया सवयी आहेत. त्या अभ्यास सवयी कोणत्या, व त्या सवयीनुसार त्यांच्या अभ्यासात प्रगती कशी होते. ही प्रगती होत

असतांना त्यांना कोणकोणत्या समस्या निर्माण होतात. हया गोष्टी जाणून घेऊन त्यांच्यावर उपयोजना सुचविणे व त्यांच्यात योग्य ती अभिरूची निर्माण करणे हा हेतू समोर ठेवून संशोधकाने परभणी शहरातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयींचा एक सर्वेक्षणात्मक अभ्यास या समस्येची निवड करून प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे.

## समस्या विधान :—

''परभणी शहरातील इयत्ता आठविच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास सवयी एक सर्वेक्षणात्मक अभ्यास.''

## परिभाषिक व्याख्या:—

**१) क्रो ॲण्ड क्रो :—**
हयांच्या मताप्रमाणे ''अभ्यास म्हणजे विशिष्ट विषयात नैपुण्य प्राप्त करणे. अभ्यासासाठी अतिशय परिश्रमा शिवाय पर्याय नाही.''
**२) मेस :—** मसे असे म्हणतात की, ''अभ्यास म्हणजे यथायोग्य प्रमाणात ज्ञान संग्रहीत करणे आणि त्याच बरोबर वस्तु स्थितीचे तत्व समजवून त्याची धारणा करून त्याचे उपयोजन करणे'' मेस (२००२)

## कार्यात्मक व्याख्या:

**१) परभणी शहर :**''परभणी जिल्हांतर्गत येणारे एक शहर''

**२)इयत्ता आठवीचा विद्यार्थी:—**''माध्यमिक स्तरावरील इयत्ता आठवीत प्रवेशीत असलेला विद्यार्थी''

**३)अभ्यास सवयी:** शालेय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी अवलंबवलेली पध्दत म्हणजे अभ्यास सवयी

## संशोधनाची गरज:—

इयत्ता आठवीचा वर्ग हा पूढील वर्गासाठी एक महत्वाचा वर्ग मानला जातो.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये याच वयात अभ्यास सवयी लावणे गरजेचे आहे. सध्याचे युग

हे विज्ञान यूग, स्पर्धेचे युग असल्यामुळे त्यांच्या मध्ये सर्व विषयाचे आकलन अतिशय चांगल्या पद्धतीने होण्यासाठी तसेच पुढील वर्गातील शालेय अभ्यासक्रमाचे आकलन चांगले होण्यासाठी अभ्यास सवयी खुप गरजेच्या आहेत. मुलांच्या सर्वांगिण विकास होण्यासाठी अभ्यास सवयी असणे गरजेच्या आहेत. विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेसाठी अभ्यास सवयी गरजेच्या आहेत. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अभ्यास सवयी गरजेच्या आहेत.

## संशोधनाचे महत्व:

आजचे युग विज्ञान युग आहे, माहिती तंत्रज्ञानाचे आहे हया युगात विद्यार्थ्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने टीकण्यासाठी अभ्यास सवयी खुप महत्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांच्या अवस्थेत अभ्यास सवयी खुप महत्वाच्या आहेत कारण त्यांच्या सर्वांगिण विकासात हया अभ्यास सवयी खुप महत्वाची भुमिका बजावत असतात.

## संशोधनाची उद्दिष्टये:

१) विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीची सदय:स्थिती अभ्यासणे
२) विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा त्यांच्या गुणत्तेवर होणाऱ्या परिणामा बाबत अभ्यास करणे.
३) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा शोध घेणे.

## संशोधनाची गृहीतके

१) विद्यार्थ्यांना स्वत:ची अशी एक अभ्यास सवय असते.
२) विद्यार्थी स्वत:ची एक अभ्यास सवय निर्माण करतो.

## संशोधन परिकल्पना :—

१) विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी त्यांच्या शालेय उद्दिष्टच्या साध्यतेवर परिणाम होतो.
२) विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होणरा परिणाम.
३) विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा त्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम जाणवतो.

## संशोधनाची कार्यपद्धती:

''परभणी शहरातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा व एक सर्वेक्षणात्मक अभ्यास'' या समस्येची संशोधन करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे.

## संशोधनाची साधने व परिमाणे :—

संशोधन समस्येच्या माहिती संकलनासाठी संशोधकाने प्रमाणित केलेल्या प्रश्नावलीचा वापर केला आहे. व प्रस्तुत संशोधनासाठी शेकडेवारी व स्क्वाय स्क्वेअर या परिमाणाचा वापर केला आहे.

## निष्कर्ष :

१) नेहमी विद्यार्थी प्रत्येक मुद्दा समजण्याच्या हेतूने काळजीपूर्वक वाचन करतात.

२) विद्यार्थी नेहमीच विषयाचे महत्व किंवा अवघडपणा यानुसार वाचनाचा वेग बदलतात.

३) विद्यार्थ्यांना कधी कधीच परीक्षा झाल्यानंतर येत असलेल्या काही गोष्टी विसरलेल्या किंवा चुकलेल्या आहेत. असे ध्यानात येते.

४) कधी कधीच विद्यार्थी घरी आल्यानंतर पुस्तकातील टिपणे आणि शिक्षकांची टिपणे एकत्र संकलीत करतात.

५) अभ्यासाच्या योग्य सवयीबद्दलचे मार्गदर्शन करण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना झाल्यास विद्यार्थी नेहमी त्यात सहभागी होतील.

## शिफारशी:

१) विद्यार्थ्यांनी नेहमी स्वत:ची टिपने उतरवुन घेतली पाहिजे.

२) शिक्षक शिकवीत असतांना नेहमी विद्यार्थ्यांनी टिपने उतरवुन घेतली पाहिजेत.

३) अभ्यास करतांना अभ्यासाची सर्व साधने जवळ असावीत प्रकरण वाचण्यापुर्वी त्याचा सारांश, रूपरेषा, दिलेली असल्यास वाचले पाहिजे, वर्गात होणाऱ्या अभ्यासाची पूर्व तयारी करून जावे तसेच वाचनालयात अभ्यासाचे साहित्य वाचावे.

४) अभ्यास करतांना आजुबाजुच्या गोष्टीमुळे लक्ष विचलीत होत असल्यास एकाग्रता वाढवावी.

५) भविष्याच्या दृष्टीने प्रत्येक विषयाचे काय महत्व आहे हे नेहमी लक्षात घेतले पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ सुची

१ . Dr. Suresh Chand, Study Habits of Secondary School Students in Relation to Type of School and Type of Family International Journal of Social Science & Interdisciplinary Research.

2. Brown W. E. & W. N. Holtzrnan 1989, Survey of Stuent habits and attitude, New York.

३. भिंताडे वि. रा. मे २००५ शैक्षणिक संशोधन पध्दती नित्य नुतन प्रकाशन

४- Dr. Pravin Laxman Kothawade Study Habits of Marathi & English Medium Student International Jouranal of Scientific Research 485 Volume : 3 Issue : 6| June 2014 ISSN No 2277 – 8179.

५. बंन्सी बिहारी पंडित शिक्षणातील संशोधन

६. रा.श.मुळे व वि. तु. उमाठे. १९८८ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपुर ४४००९

७. डॉ.प्रदिप आगलावे – २००० संशोधन पध्दती आणि संख्याशास्त्र विद्या प्रकाशन नागपुर.

८. शिक्षण तरंग, महाराष्ट राज्य संशोधन केंद्र पूणे, २००९ सप्टेबर अंक १ला

९. डॉ. चा. प. कदम – शैक्षणिक संख्याशास्त्र नित्य नूमन प्रकाशन फेब्रुवारी २००७.

१० .Naggappa P. S. & Venkatesh N 1998, Study habits of secondary school students in Maysore city.

११- Rajendran S., Raji A., Sumathi P. 2009, Are study habits gender biased.